Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 29/05/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष



## ख्यातनाम गायिका हिराबाई बडोदेकर

हिराबाई बडोदेकर या हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील किराणा घराण्याच्या ख्यातनाम गायिका होत्या. त्यांचा जन्म २९ मे १९०५ रोजी महाराष्ट्रातील मिरज येथे झाला. किराणा घराण्याचे प्रसिद्ध गायक अब्दुल करीमखाँ आणि ताराबाई माने यांच्या त्या कन्या. हिराबाईंनी पुण्याच्या हुजूरपागा शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले, पण त्यांच्या मूळ आवडीप्रमाणे त्या संगीताकडे वळल्या. त्यांचे सुरुवातीचे संगीताचे शिक्षण ताराबाईंकडे आणि मोठे बंधू सुरेशबाबूंकडे झाले. त्यांच्याकडून हिराबाईंना संगीताचे सतत मार्गदर्शन लाभत असे. ताराबाई तबल्यावर ठेका धरणे, स्वरलेखन करणे अशा गोष्टी लीलया करत. हिराबाईंना किराणा घराण्याची रितसर तालीम अब्दुल वहीद खाँ यांच्याकडून १९१८ पासून १९२२ पर्यंत मिळाली.

हिराबाईंचे पहिले जाहीर गायन वयाच्या १६ व्या वर्षी गांधर्व महाविद्यालयाच्या संगीत परिषदेमध्ये मुंबईत झाले (१९२१). तेथे त्यांनी पटदीप हा राग गायला. त्यांचे गाणे लोकांना आवडले व प्रसिद्धीही मिळाली. १९२३ साली एच.एम.व्ही. (हिज मास्टर्स व्हॉइस) या संस्थेने हिराबाईंची 'जया अंतरी भगवंत' ही मराठी भजनांची पहिली ध्वनिमुद्रिका काढली. त्याचबरोबर 'सखी मोरी रुमझुम' ही हिंदी ध्वनिमुद्रिकाही काढली. ध्वनीमुद्रिकांसाठी आवश्यक असणारे नेमके आणि मर्यादित वेळेत प्रभावीपणे गाण्याचे तंत्र हिराबाईंनी अचूकपणे साधले होते. त्यांच्या ध्वनिमुद्रिकांना खूप लोकप्रियता व मागणी लाभली. त्यांच्या गायनाच्या सुमारे १७५ ध्वनिमुद्रिका निघाल्या. आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून १९२८ सालापासून त्यांनी गाण्यास सुरुवात केली. जवळपास ४० आकाशवाणी केंद्रांवरून त्यांचे गाणे प्रसारीत होई. आकाशवाणी आणि ध्वनिमुद्रिका यांतून त्यांचे गाणे सर्वदूर पसरले. अशा या ख्यातनाम गायिकेचे २० नोव्हेंबर १९८९ रोजी निधन झाले.

Nashik Edition

May 29, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON, YEOLA DIST. NASHIK
CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401